**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**
(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**महाविद्यालय विकास विभाग**
जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉईंट मार्ग, नागपूर - ४४००३३
दुरध्वनी क्रमांक: ०७१२-२५२९९१२ फॅक्स नं: ०७१२-२५५५७०१, E-mail ID: infoarcollage@ymail.com

०१

दिनांक : 24-03-2025

प्रती,

प्राचार्य,
आठवले समाजकार्य महाविद्यालय
स्टेशन रोड भंडारा ता.- भंडारा, जि.- भंडारा - 441904

विषय :- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ११७ अंतर्गत गठीत चौकशी समितीचा अहवालानुसार महाविद्यालयास ग्रेड प्रदान करण्याबाबत.

संदर्भ :- विद्यापीठाचे पत्र क्र. १३ दि. 01-02-2004

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, आपल्या महविद्यालयात **बॅचलर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ सोशल वर्क** हे अभ्यासक्रम सुरू आहे. सदर अभ्यासक्रम चालविण्याकरिता महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या सोई सुविधा, उपलब्ध शिक्षक, वित्तिय बाबी इत्यादिंचा अभ्यास करुन आपले महाविद्यालयाचा शैक्षणिक व प्रशासकिय दर्जा ठरविण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ११७ अंतर्गत गठीत चौकशी समितीने आपले महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन सादर केलेल्या अहवालास अधिष्ठता मंडळाच्या शिफारशीनुसार दि. ०७-०१-२०२५ रोजी विद्यापरिषदेच्या सभेत मान्यता प्रदान केली आहे. अहवालातील शिफारशीनुसार आपले महाविद्यालयास पुढील ३ वर्षाकरिता A ग्रेड प्रदान करण्यात आला आहे. सदर अहवाल आपले माहीतीस्तव सोबत जोडून पाठविण्यात येत असून सदर अहवालात प्रदान करण्यात आलेले गुण व श्रेणी(Grade) याबाबत आपले काही म्हणने / आक्षेप असल्यास आपण सदर गुणदान व श्रेणी बाबत मा. कुलगुरुकडे सदर पत्र मिळाल्यापासुन १० दिवसांचे आत अपील सादर करू शकता. आपले अपिलावर मा. कुलगुरुद्वारे घेण्यात येणारा निर्णय हा अंतिम राहणार असुन त्यानंतर कोणतीही बाजु ऐकुण घेतल्या जाणार नाही.

करिता आपणास सुचित करण्यात येते की, उपरोक्त विहीत मुदतीत आपले काही म्हणने / आक्षेप असल्यास मा. कुलगुरुंकडे अपिल सादर करावे. उपरोक्त मुदतीत आपण अपिल सादर न केल्यास आपले काहीही म्हणने नाही असे गृहीत धरुन विद्यापरिषदेचा निर्णय कायम समजण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

( डॉ. राजेंद्र ऊतखेडे )
उपकुलसचिव
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ,नागपूर

OPPO F11
2025/03/25 14:40